मा.अति.महा.आयुक्त (ज),
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र:-१/ २७६
दिनांक :- ०९/०६/१६

अति.महा.आयुक्त (ज)कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
जावक क्र :-अतिमआ(ज)/उआसाप्र/आस्था/९५७५
दिनांक :- ०९/०६/१६

**-: आ ज्ञा प त्र :-**

**विषय :-** ''लिपीक टंकलेखक'' या संवर्गातून ''वरिष्ठ लिपीक'' (वे.श्रे.रु.५२००-२०२०० + ४१०० ग्रेड पे +मान्य भत्ते) या संवर्गात सेवकांचे बढतीचे नेमणूकांबाबत.

**संदर्भ:-** १) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र.१/४९७ दि.०५/०९/२०१५
२) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज) ठराव क्र.१/५७७ दि.२४/०९/२०१५
३) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज) ठराव क्र१/२७५ ,दि.०९/०६/१६

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील लेखनिकी संवर्गातील ''वरिष्ठ लिपीक'' (वे.श्रे.रु.५२००-२०२०० + ४१०० ग्रेड पे + मान्य भत्ते) या पदावर ''लपीक टंकलेखक'' (वे.श्रे.रु.५२००-२०२०० + २९०० ग्रेड पे + मान्य भत्ते) या निम्न संवर्गातील सेवकांच्या संदर्भ क्र.१ व २ चे मान्यतेस अनुसरुन खालील प्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तपशिलानुसार या आज्ञापत्राच्या दिनांकापासून बढतीने हंगामी नेमणूका करण्यात येत आहेत.

| अ क्र | सेवकाचे नांव व नेमणूकीचा गट | सध्याचे खाते | बढतीचे खाते | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. आंबवणे राकेश शशिकांत (खुला) | मोटार वाहन विभाग | मोटार वाहन विभाग | रिक्त जागी |
| २ | श्री. भांड धनराज लक्ष्मण (अजा) | स्थानिक संस्था कर कार्यालय | घोले रोड क्षेत्रिय कार्यालय | रिक्त जागी |

१) वरील सेवकांचे बढतीचे पदावरील कामकाज समाधानकारक न आढळल्यास संबंधित सेवकास कोणतीही पूर्वसूचना न देता बढतीपूर्व पदावर नेमण्यात येईल.

२) बढतीने नियुक्त केलेल्या सेवकांना संबंधित खातेप्रमुख यांनी तात्काळ कार्यमुक्त करावे. कोणत्याही कारणास्तव बढतीने नियुक्त केलेल्या सेवकांना खात्यात रोखून धरु नये.

३) संबंधित सेवकांना मनपा सेवा विनियमानुसार वेतन व भत्ते आदा करणेत यावेत. बढतीने नेमणूका करणेत आलेल्या सेवकांचे वेतन बढती झालेल्या कार्यालयाकडेच काढले जाईल याची दक्षता मुख्य लेखा व वित्त विभाग कार्यालयाने घ्यावयाची आहे.

४) बढतीने नियुक्त केलेल्या सेवकास वेतन श्रेणी पर्याय स्विकृतीची मुदत त्याच्या बढतीच्या दिनांकापासून सेवा विनियमास अनुसरुन ३ महिन्यांची आहे. एकदा स्विकारलेला पर्याय पुन्हा बदलता येणार नाही.

५) वरील सेवकांची मा. विभागीय आयुक्त, मागास वर्ग कक्ष, महाराष्ट्र शासन यांचेकडील अंतिम रोस्टर पडताळणी अहवालाचे अधिन बढतीने नेमणूक करण्यात येत आहे.

६) मा. महापालिका आयुक्त यांनी ठ.क्र.१/२७७ दि.२९/०६/२०१५ अन्वये मान्यता दिल्याप्रमाणे नविन सेवा प्रवेश मंजूरीपूर्वीच विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेल्या सेवकांना, त्यांचे बढतीने नेमणूकीचे आज्ञापत्राचे दिनांकापासून पाच वर्षांमध्ये पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल अन्यथा त्यांना त्यांचे मूळ पदावर पदावनत केले जाईल या अटीवर पदोन्नतीने नेमणूक देण्यात येत आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी पुढील जरुर ती तजविज करावी.

(राजेंद्र जगताप)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका

**प्रत :** मा.संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख,
पुणे महानगरपालिका.

यांजकडे पुढील तजवीजीसाठी रवाना--

(मंगेश जोशी)
**उप आयुक्त (सा.प्र.)**
पुणे महानगरपालिका